# महाराष्ट्र विधानसभा

**दिवसाच्या कामकाजाचा क्रम**
**बुधवार, दिनांक २ ऑगस्ट, २०१७**
**(सकाळी ११.०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**उच्च व तंत्र शिक्षण मंत्री :**

(क) श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई यांचा दिनांक १ एप्रिल, २०१३ ते ३१ मार्च, २०१४ या कालावधीचा वार्षिक अंकेक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचे सन २०१५-२०१६ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

(ग) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांचे सन २०१५-२०१६ या वर्षाचे वार्षिक लेखे (अंकेक्षण अहवालासह) सभागृहासमोर ठेवतील.

(घ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ङ) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचा दिनांक १ एप्रिल, २०१५ ते ३१ मार्च, २०१६ या कालावधीचा वार्षिक अंकेक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : विधानसभा सदस्य अनुपस्थिती समिती (२०१५-२०१६) चा सहावा अहवाल सादर करणे व त्यावर विचार करणे.**

**चार : विनंती अर्ज सभागृहास सादर करणे :-**

**श्री.राहुल बोंद्रे, वि.स.स.** : **"मौजे वैरागड, ता.चिखली जिल्हा बुलढाणा येथील संग्राहक तलावाचे काम सुरु होण्याबाबत"** या विषयावरील विनंती अर्ज सभागृहास सादर करतील.

**पाच : स्थगन प्रस्तावाच्या सूचना – (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**सहा : औचित्याचे मुद्दे.**

**सात : शासकीय विधेयक :**

**पुर:स्थापनार्थ, विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४८ - महाराष्ट्र (द्वितीय पुरवणी) विनियोजन विधेयक, २०१७.

**आठ : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(दिनांक १ ऑगस्ट, २०१७ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १)**

(१) **श्री. शंभूराज देसाई, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मौजे म्हारवंड व मौजे जिमनवाडी (ता.पाटण, जि.सातारा) ही गावे डोंगरी भागात वसलेली असणे, या दोन्ही गावांमध्ये प्रत्येकी ६८ कुटुंबे असणे, दोन्ही गावांच्या वर दरड असणे, माहे जुलै, २०१७ पासून सुरु असलेल्या अतिवृष्टीमुळे या दोन्ही गावांच्या वरील भागातील जमीनी मोठ्या प्रमाणात खचून मोठे दगडही निसटण्यास सुरुवात होणे, म्हारवंड व जिमनवाडी या गावांचीही परिस्थिती माळीण (जि.पुणे) या गावाप्रमाणेच असल्यामुळे या दोन्ही गावांतील ग्रामस्थांमध्ये पसरलेले भितीचे वातावरण, लोकप्रतिनिधी, तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय अधिका-यांकडून या दोन्ही गावांचे सर्वेक्षण करण्यात येवून या गावांच्या पुनर्वसनाचा अहवालही तयार करण्यात येणे, दरडी कोसळण्यास प्रतिबंध व्हावा यासाठी शासनामार्फत ठोस उपाययोजना राबविणे गरजेचे असणे, सदर दोन्ही गावांच्या पुनर्वसनाच्या कामांना शासनाकडून होत असलेल्या दिरंगाईमुळे नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री.भारत भालके, राधाकृष्ण विखे-पाटील, जयकुमार गोरे, प्रा. वर्षा गायकवाड, श्रीमती निर्मला गावित, सर्वश्री. डी. पी. सावंत, अमीन पटेल, अस्लम शेख, डॉ. पतंगराव कदम, सर्वश्री. मो. आरिफ नसीम खान, डॉ. संतोष टारफे, ॲड. यशोमती ठाकूर, कु. प्रणिती, शिंदे, श्री. संग्राम थोपटे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"पंढरपूर हे भारताचे दक्षीण काशी म्हणून ओळख असलेले देवस्थान, वर्षातून चारवेळा याठिकाणी भरत असलेली यात्रा, प्रामुख्याने आषाढी व कार्तिकी या यात्रांमध्ये लाखोंचा जनसमुदाय श्री विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी दाखल होत असणे, परंतु स्थानिक प्रशासन व राज्य शासन भक्तांना प्राथमिक सोयीसुविधा पुरविण्यामध्ये असमर्थ असल्याचे आढळून येणे, शासनाने या देवस्थानाचा विकास व्हावा यासाठी मंदिर समिती स्थापित केलेली असणे, परंतु या मंदिर समितीमार्फत वारक-यांना सोयीसुविधा पुरविण्यात आलेले अपयश, शासनाने पंढरपूर शहराचा विकास करण्यासाठी पंढरपूर विकास प्राधिकरण स्थापन करुनही शहरातील विकासकामे अद्यापपर्यंत अपूर्णावस्थेत असणे, वारक-यांना मुलभूत सोयीसुविधा देण्यासाठी शासनाने व नगरपालिकेने भाविकांसाठी कायमस्वरुपी स्वच्छतागृहे उभारण्याचे प्रतिज्ञापत्र उच्च न्यायालयात सादर केले असणे, खाजगी कंपन्यांना जादा दराने या मोबाईल टॉयलेटचे कंत्राट देऊन कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार होत असणे, विठ्ठल मंदिर समितीमध्ये स्थानिक वारक-यांना कुठलेही स्थान नसल्याने, वारक-यांनी पालख्या रोखून धरणे, त्यामुळे भविष्यात वारक-यांचे आंदोलन चिघळण्याची असलेली शक्यता, पंढरपूर यात्रा अनुदानामध्ये विशेष निधीची तरतूद करण्याची आवश्यकता, पंढरपूर (जि.सोलापूर) येथे चंद्रभागा नदीमध्ये वाळू उपसामुळे झालेल्या खड्डयांमुळे १) गणेश सिधुप्पा जुमाळे, २) धीरज सिधुप्पा जुमाळे ३) श्रीपाद सुनिल शहापूरकर ४) सौरभ अनिल शहापूरकर या चार चिमुकल्या मुलांचा तसेच अनेक भाविकांचा नदीपात्रात बुडून दुर्देवी मुत्यू झाला असणे, या प्रकरणी प्रशासनाने तातडीने कार्यवाही केली नसल्याने भविष्यामध्ये अशा दुर्देवी घटना टाळण्यासाठी प्रशासन उदासीन असल्याचे दिसून येणे, सदर भागात नगरपालिकेने सी सी टी व्ही बसविलेले असूनही त्याचा काहीही उपयोग होत नसणे, या चार बालकांना स्थानिक नागरिकांनी तातडीने उपजिल्हा रुग्णालय, पंढरपूर (सरकार कॉटेज दवाखाना) येथे नेण्यात येणे, परंतु सदर रुग्णालयात डॉक्टर किंवा इतर कर्मचारी हजर नसणे, सदर उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टर व कर्मचारी कामात हलगर्जीपणा करत असल्याचे वारंवार उघडकीस येणे, तथापि त्यांच्याविरुध्द वरिष्ठाकडून अद्याप कुठलीच कारवाई केली नसल्याचे निदर्शनास येणे, परिणामी शासनाच्या प्रति स्थानिक नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री. जितेंद्र आव्हाड, अजित पवार, जयंत पाटील, दिलीप वळसे-पाटील, शशिकांत शिंदे, संदीप नाईक, भास्कर जाधव, राणाजगजीतसिंह पाटील, नरहरी झिरवाळ, पांडुरंग बरोरा, वैभव पिचड, सुरेश लाड, किसन कथोरे, कालीदास कोळंबकर, अमीन पटेल, अस्लम शेख, मो. आरिफ नसीम खान, प्रा.वर्षा गायकवाड, श्री अबु आझमी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईला जोडणा-या पूर्व द्रुतगती महामार्गावरील ठाणे व मुलुंड दरम्यान रेल्वे रुळावर उभारण्यात आलेल्या पुलाच्या स्लॅबचे सिमेंट निखळलेले असून सदरचा पूल धोकादायक स्थितीत असल्याचे माहे जुलै, २०१७ मध्ये निदर्शनास येणे, मुंबई आणि ठाणे शहरासह राज्यातील इतर भाग आणि गुजरात, मध्यप्रदेश व इतर परराज्यांना जोडणारा कोपरी पुल अत्यंत महत्वाचा असून वाहनसंख्येचा विचार केल्यास या परिसरात वाहतुकीची निर्माण झालेली गंभीर समस्या, मुंबईहून येणारा व जाणारा पूर्व द्रुतगती महामार्ग ८ पदरी असतांना कोपरी पुल मात्र चारच पदरी असणे, या पुलावरुन दररोज किमान एक लाख वाहने ये-जा करत असुन पुलाच्या खालुन लाखो प्रवाशांना घेऊन रेल्वे लोकलची वाहतुक सुरु असणे, महाड येथील सावित्री नदीवरील पुल कोसळून झालेल्या अपघाताचा विचार करता कोपरी येथील पुल रेल्वे रुळावर कोसळल्यास गंभीर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असतांना प्रशासनाचे त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, सदर पुलाचे रुंदीकरण व पुनर्बांधणी तातडीने करण्याबाबत लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटनांनी शासनाकडे केलेल्या मागण्या, शासनाचे त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी लाखो वाहनचालकांबरोबरच नागरीकांमध्ये पसरलेला असंतोष, सदर प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री. संजय सावकारे, उदेसिंग पाडवी, पास्कल धनारे, किशोर पाटील, डॉ. सतीश पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे ग्रामविकास मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील विशेषत: जळगांव जिल्हयातील साकरी, खंडाळा, मोंढाळा, कुऱ्हेपाणाचे, गोजोरा, वांजोळा या गावातील जिल्हापरिषदेच्या शाळांना जिल्हा परिषद व ग्रामपंचायत सदस्यांनी दिनांक ३० जून, २०१७ रोजी भेट देऊन पोषण आहाराबाबत केलेली चौकशी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी सदस्यांसमवेत धरणगाव, भुसावळ, चोपडा तालुक्यातील दहा शाळा व ठेकेदाराच्या गोदामामधील मालाचीही केलेली तपासणी, जिल्हा परिषदेच्या शाळामध्ये देण्यात येणाऱ्या शालेय पोषण आहारातील धान्याच्या मालाचे दर व बाजारातील दर यात मोठया प्रमाणात तफावत असल्याचे निदर्शनास येणे, शालेय पोषण आहारामध्ये शासनाचे मोठया प्रमाणात नुकसान होत असल्याने पुरवठादाराला मुदतवाढ देऊ नये तसेच शाळास्तरावर मुख्याध्यापकांनी देयके सादर

करावीत असे शासनाचे आदेश असतांना जिल्हा परिषदेने पुरवठादाराला नियमबाह्य दिलेली मुदतवाढ, सन २०१४-१५ मधील पोषण आहारामध्ये झालेल्या आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी पुरवठादाराविरुध्द अद्यापही गुन्हा दाखल न होणे, या प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव यांना निवेदन देऊनही कोणतीच कार्यवाही न झाल्याने नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, शालेय पोषण आहारातील गैरव्यवहाराची चौकशी करुन संबंधितांविरुध्द तातडीने कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**नऊ : शासकीय विधेयके :**

(**अ**) **विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१)** (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री विजय वडेट्टीवार, अमिन पटेल, हर्षवर्धन सपकाळ, प्रा.वीरेंद्र जगताप, सर्वश्री शशिकांत शिंदे, अजित पवार, भास्कर जाधव, जितेंद्र आव्हाड, संजय कदम, दिलीप वळसे-पाटील, हसन मुश्रीफ, अबु आजमी, डॉ.सतीश पाटील, सर्वश्री ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, सुरेश लाड, राहुल मोटे, दिपक चव्हाण, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री जयदत्त क्षीरसागर, राजेश टोपे, पांडुरंग बरोरा, हनुमंत डोळस, वैभव पिचड, बाळासाहेब पाटील, जयंत पाटील, सुनील केदार, राणाजगजितसिंह पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०१७ नापसंत करते."

(ख) **सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४१ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१७.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अस्लम शेख, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४१ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४१ – महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४१ – महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुभाष उर्फ पंडितशेट पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४१ – महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, प्रा.वीरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४१ – महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२)** (क) **सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४३ — महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०१७.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अस्लम शेख, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४३ — महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४३ — महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४३ — महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, प्रा.वीरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४३ — महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण

करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ११ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(३)** (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये श्री. हर्षवर्धन सपकाळ, प्रा.वीरेंद्र जगताप, सर्वश्री शशिकांत शिंदे, अजित पवार, भास्कर जाधव, जितेंद्र आव्हाड, संजय कदम, दिलीप वळसे-पाटील, हसन मुश्रीफ, अबु आजमी, डॉ.सतीश पाटील, सर्वश्री ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, सुरेश लाड, राहुल मोटे, दिपक चव्हाण, संदीप नाईक, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री जयदत्त क्षीरसागर, राजेश टोपे, पांडुरंग बरोरा, हनुमंत डोळस, वैभव पिचड, बाळासाहेब पाटील, जयंत पाटील, राणाजगजितसिंह पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४ – महाराष्ट्र मोटार वाहन कर (सुधारणा) अध्यादेश, २०१७ नापसंत करते."

(ख) **सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४४ – महाराष्ट्र मोटार वाहन कर (सुधारणा) विधेयक, २०१७.**

---

**(४)** (क) **सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४७ – महाराष्ट्र जमीन महसूल संहिता आणि महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापराचे रुपांतर व अकृषिक आकारणी) नियम (सुधारणा) विधेयक, २०१७.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अस्लम शेख, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४७ – महाराष्ट्र जमीन महसूल संहिता आणि महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापराचे रुपांतर व अकृषिक आकारणी) नियम (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४७ – महाराष्ट्र जमीन महसूल संहिता आणि महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापराचे रुपांतर व अकृषिक आकारणी) नियम (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत प्रा.वीरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४७ – महाराष्ट्र जमीन महसूल संहिता आणि महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापराचे रुपांतर व अकृषिक आकारणी) नियम (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ११ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(५)** (क) **सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३९ – महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) विधेयक, २०१७.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, सुनील केदार, अमर काळे, विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ३९ – महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, अजित पवार, दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, जयदत्त क्षीरसागर, शशिकांत शिंदे, भास्कर जाधव, जितेंद्र आव्हाड, हसन मुश्रीफ, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री सुरेश लाड, राणाजगजितसिंह पाटील, बाळासाहेब पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ३९ – महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ३९ – महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत प्रा.वीरेंद्र जगताप, श्री.हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ३९ – महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(ब) विधानसभेने संमत केलेले विधेयके महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम १४१(१) अन्वये पुन्हा संमत करणे :-**

(१) सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक २ – मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७.

(२) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ – मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१७.

(३) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० – भारतीय भागीदारी (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७.

**(मंगळवार, दिनांक १ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

दहा : **सर्वश्री शंभुराज देसाई, बाबुराव पाचर्णे, राजाभाऊ वाजे, समीर कुणावार, सत्यजित पाटील, उन्मेश पाटील, किशोर पाटील, संतोष दानवे, डॉ.जयप्रकाश मुंदडा, श्रीमती संगिता ठोंबरे, डॉ.संजय रायमुलकर, सर्वश्री प्रशांत ठाकूर, अनिल बाबर, सुरेश हाळवणकर, प्रकाश आबिटकर, शिवाजीराव नाईक, सुभाष साबणे, शिवाजीराव कर्डिले, चंद्रदिप नरके, किसन कथोरे, ज्ञानराज चौगुले, डॉ.पंकज भोयर, श्री उल्हास पाटील, डॉ.सुनिल देशमुख, सर्वश्री अनिल कदम, हरिष पिंपळे, वैभव नाईक, राजू तोडसाम, राजन साळवी, डी. मल्लिकार्जुन रेड्डी, सदानंद चव्हाण, सुनिल प्रभू, सुधाकर भालेराव,**

**राजेंद्र नजरधने, ॲड· आकाश फुंडकर, सर्वश्री चरण वाघमारे, सुधीर पारवे, डॉ.तुषार राठोड, श्री अतुल सावे, डॉ. सुरेश खाडे, सर्वश्री अमल महाडीक, किर्तीकुमार भांगडीया, महेश लांडगे, रवी राणा, विनायकराव जाधव-पाटील, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर) :-**

"मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत वाड्या, वस्त्या व ग्रामीण भागातील ७२०० किमी रस्त्याच्या लांबीचे सन २०१५-१६ व २०१६-१७ करिता उद्दीष्ट ठरविलेले असणे, त्या व्यतिरिक्त राज्याच्या ग्रामीण भागात, डोंगरी विभागात तसेच छोट्या वस्त्या, वाड्या यांना जोडणारे गावपोहच रस्ते, मार्ग व छोटे पूल, मोरी, पांदण रस्ते यांच्या बांधकामाची व दुरूस्तीची अपूर्ण कामे पूर्ण करण्याची आवश्यकता, राज्यातल्या ग्रामीण भागातील रस्त्यांच्या दर्जावाढीचे प्रस्ताव, माहे एप्रिल, २००९ पासून राबविण्यात येत असलेल्या केंद्र शासनाच्या राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेकरिता सन २०१५ पासून नवीन कामांना निधी उपलब्ध नसणे, सन २०१६-१७ पासून राबविण्यात येत असलेल्या राज्य शासनाच्या मुख्यमंत्री ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या निकषात न बसणाऱ्या व पिण्याच्या पाण्याची सोय नसणाऱ्या राज्यातील गावे, वाडे, वस्त्या यांच्या पिण्याच्या पाण्याची सोय करणे, ग्रामीण भागातील सर्व वाडया, वस्त्या व डोंगरी भागातील सर्व गावाचे विद्युतीकरण करण्याची आवश्यकता, शेती पाणी पुरवठा योजनेच्या वीज दरामध्ये झालेली दरवाढ, वीज बिलाची वसुली थांबविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १ ऑगस्ट, २०१७.

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.